सातारा जिल्हा परिषद,सातारा,ग्रामपंचायत विभाग.
दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३८४३ ईमेल vptzpsatara2@yahoo.in

६४८७

**अत्यंत महत्वाचे** क्र.ग्रापं/५/कावि/ /२०१६, दिनांक १/७/२०१६

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,.....(सर्व) जि.सातारा

विषय :- **आमचं गाव आमचा विकास - ग्रामपंचायत विकास आराखडा प्रभावी अंमलबजावणीबाबत..**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीडीपी-२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.-६ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये, १४ व्या वित्त आयोगाच्या निर्देशानुसार '**आमचं गाव आमचा विकास**' या उपक्रमांतर्गत जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेची प्रक्रिया सुरु आहे. या अनुषंगाने सर्व संबंधित लक्ष घटकांचे क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले आहेत. काही ग्रामपंचायतींमध्ये साडेतीन दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया सुरु झाली आहे. सद्यस्थितीत सुरु असलेल्या प्रक्रियेस अनुसरुन खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयामध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याबाबतची प्रक्रिया सविस्तर नमुद करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोर पालन करावे.

२) मा.राज्य प्रकल्प संचालक,राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र.जीपीडीपी२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६ दिनांक ८ जून, २०१६ नुसार, वार्षिक आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे नियोजन करणे आवश्यक असलेचे कळविले आहे.
   a. महिला व बाल कल्याण : १० टक्के
   b. अनुसूचित जाती/जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात.
   c. आरोग्य, शिक्षण, उपजिविका (Livelihood) : २५ टक्के

ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी विभागनिहाय **वरीलप्रमाणे तरतुद फक्त १४ व्या वित्त आयोगाच्या निधीसाठी लागू आहे**. तसेच, ग्रामपंचायतींना उपलब्ध असलेल्या स्त्रोतातून प्राप्त होणाऱ्या निधीमध्ये वाढ (दुप्पट वा दिडपट) न करता मूळ तरतुदीनुसार आराखडा तयार करण्यात यावा. फक्त १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दुप्पट निधी पंचवार्षिक आराखडयासाठी व दिडपट निधी वार्षिक आराखडा तयार करताना विचारात घेण्यात यावा, असे स्पष्टीकरण कळविण्यात आले आहे. त्यानुसार सदर बदलाबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिनांक ८ व ९ जून, २०१६ रोजीचे गट विकास अधिकारी यांचे कार्यशाळेमध्ये आपणास देण्यात आल्या आहेत. सदर सूचना तातडीने सर्व प्रभारी अधिकारी व प्रविण प्रशिक्षक, ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणण्याबाबत सदर कार्यशाळेत सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापि, उपरोक्त बदलाबाबत ग्रामपंचायत स्तरावर, प्रभारी अधिकारी, प्रविण प्रशिक्षक यांना आवश्यक ती माहिती नसलेचे निदर्शनास येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. तात्काळ सदर तरतुदी सर्व ग्रामसेवक, प्रभारी अधिकारी व प्रविण प्रशिक्षकांच्या निदर्शनास आणाव्यात.

३) आमचं गाव आमचा विकास अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे हा शासनाचा अत्यंत प्राधान्याचा व महत्वाकांक्षी उपक्रम असून **याबाबत ग्रामसेवकांमध्ये जाणीवजागृती नसल्याचे प्रकर्षाने दिसून येत आहे.** त्यामुळे सदरचा कार्यक्रम अत्यंत ताकदीने (प्रभावीपणे) ग्रामपंचायत स्तरावर पोहोचविणे आवश्यक आहे.

४) आपणाकडून प्राप्त नियोजन आराखडे पाहता, काही ग्रामपंचायतींचे विकास आराखडे तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असलेचे दिसून येते. आपणास सूचित करणेत येते की, जसे जसे आराखडे तालुकास्तरावर छाननीसाठी प्राप्त होतील, तसे ते आराखडे तपासून ग्रामपंचायतीकडे परत पाठवावेत. छाननी करताना उपरोक्त मुद्दा क्र.२ मध्ये नमुद केलेनुसार २५ टक्के मानव विकास निर्देशांक, अनु.जाती/जमातीचे कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तदतुद, महिला व बाल कल्याणासाठी १० टक्के तरतुद इ. बाबींची कटाक्षाने छाननी करावी. तसेच दुप्पट व दिडपट करतान वरील दि.८ जून २०१६ चे पत्रातील **सूचनांनुसार फक्त १४ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दुप्पट निधी पंचवार्षिक आराखडयासाठी व दिडपट निधी वार्षिक आराखडा तयार करताना विचारात घेण्यात आला असल्याची छाननी करावी.**

५) संदर्भांकित शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ६.५.१ नुसार ग्रामनंचायतींच्या विकास आराखडयाच्या तांत्रिक छाननीसाठी गट स्तरावर गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **गटस्तर तांत्रिक छाननी समिती स्थापन करावयाची आहे. सदर समितीचे तात्काळ गठण करुन तांत्रिक छाननीचे कामकाज सुरु करावे.**

६) दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी तांत्रिक छाननी समितीमार्फत छाननी करुन ग्रामसभेच्या अंतिम मान्यतेसाठी आराखडा पाठविल्यानंतर ग्रामपंचायतीने दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी देखील ग्रामसभेची अंतिम मान्यता देण्यास हरकत नाही. काही ग्रामसेवकांकडे एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्यास प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी छाननी पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेची अंतिम मान्यता दिनांक १५ ऑगस्ट,२०१६ पूर्वी घेणे संयुक्तीक होईल.

७) **आमचं गाव आमचा विकास हा उपक्रम केवळ रस्ते, गटर्स निर्माण करण्याचे साधन नसून मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी** आरोग्य, शिक्षण व उपजिविकासंदर्भातील कामे आराखडयात समाविष्ट करणे अनिवार्य आहे. तथापि याबाबत ग्रामपंचायतस्तरावर तसेच प्रभारी अधिकारी व प्रविण प्रशिक्षकांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपलेस्तरावरुन मानव विकास निर्देशांकाबाबत उचित मार्गदर्शन करावे.

८) संदर्भांकित शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ५.३ नुसार संबंधित ग्रामपंचायतीच्या सदस्य संख्येच्या किमान तिप्पट संख्येइतक्या व्यक्तींचा समावेश ग्राम संसाधन गटामध्ये असणे अनिवार्य आहे. ग्रामपंचायतीचा आराखडा गुणात्मकदृष्टया अधिक चांगला होण्यासाठी ग्राम संसाधन गटाची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. गावातील सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व करणारे घटक ग्राम संसाधन गटामध्ये असणे आवश्यक आहे. परंतु, ग्रामसंसाधन गटामध्ये सदस्यांची निवड करताना पुरशी काळजी ग्रामपंचायतींनी घेती नसल्याचे काही ठिकाणी दिसून येत आहे. किंबहुना काही ठिकाणी संसाधन गट स्थापन केले नसल्याची बाब निदर्शनास येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. याबाबत तात्काळ ग्रामपंचायतींना सूचना निर्गमित करुन प्रभावी ग्राम संसाधन गट स्थापन करण्याची दक्षता घ्यावी. **तसेच गावनियोजन प्रक्रियेमध्ये सर्व सदस्य पूर्ण साडेतीन दिवस हजर असणे आवश्यक आहे. ग्राम संसाधन गट स्थापन न केलेल्या ग्रामसेयकांचेवर कारवाईचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.**

९) ग्रामपंचायत पुस्तिका व महसुली गाव पुस्तिका सर्व गावस्तरीय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने परिपूर्ण भरणे अनिवार्य आहे. सर्व रकाने व सर्व मुद्यांची माहिती भरणे अनिवार्य आहे. त्यादृष्टीने कार्यवाही हात असलेची खातरजमा आपण स्वतः व आपलेस्तरवरुन नेमण्यात आलेल्या संपर्क अधिकारी यांचेमार्फत वेळोवेळी खातरजमा करावी. **माहितीकोष अपूर्ण भरुन अथवा न भरताच ग्रामपंचायत विकास आराखडा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही केलेचे निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित ग्रामसेवक व प्रभारी अधिकारी यांचेवर कारवाईचा प्रस्ताव** या कार्यालयास सादर करावा.

१०) आराखडयामध्ये समाविष्ट करावयाच्या कामांबाबत ग्रामसभेला ग्रामसेवक व प्रभारी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले पाहिजे जेणेकरुन लोकांचे आरोग्य व जीवनमान सुधारण्यासाठी पूरक कामांचा समावेश आराखडयात होईल. केवळ रस्ते, गटारे अशा स्वरुपाची कामे घेण्याने आमचं गाव आमचा विकास उपक्रमाचा उद्देश सफल होणार नाही. आराखडयात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पुनर्भरण, जलसंधारण कामे, शोषखड्डे, वृक्षलागवड व संगोपन, आरोग्य, शिक्षण, उत्पन्न वाढीसाठी आवश्यक कार्यक्रम यांचा समावेश असणे अत्यावश्यक आहे.

११) गावासाठी आपण स्वतः आणि नेमलेल्या संपर्क अधिकाऱ्यांमार्फत संनियंत्रण करावे. गावनियोजन प्रक्रिया सुरु असलेल्या गावांमध्ये भेट दिली असता लोकसहभाग प्रभावीपणे आढळून आलेला नाही. ही बाब गंभीर आहे. ग्रामपंचायतीमार्फत या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार अत्यंत प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. केवळ एखादा प्लेक्स लावून कार्यक्रमाची व्याप्ती वाढणार नाही. यासाठी गावातील तरुण मंडळे, युवक-युवती, बचत गटातील महिला यांचा प्रचार व प्रसारासाठी सहभाग घ्यावा.

१२) जिल्हास्तरीय प्रविण प्रशिक्षक यांचेशी समन्वय ठेवून जास्तीत जास्त ग्रामपंचायतींना त्यांचेमार्फत मार्गदर्शन होईल याचे नियोजन करावे.

१३) प्रत्यक्ष नियोजन प्रक्रिया शासनाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच (शून्य दिवस, पहिला दिवस, दुसरा दिवस, तिसरा दिवस) याप्रमाणेच राबवावी. सदर प्रक्रियेतील कोणतीही कृती कमी करु नये अथवा क्रम बदलू नये.

१४) गावनियोजन प्रक्रिया सुरु करणेपूर्वी गावात दवंडी, फळे लिहिणे, प्लेक्सबोर्ड व इतर माध्यमाद्वारे व्यापक जनजागृती करणेत यावी.

१५) ग्रामस्तरीय शासकीय कर्मचाऱ्यांना उपस्थित राहणेबाबतच्या लेखी सूचना निर्गमित करणेबाबत संबंधित विभागाच्या तालुकास्तरावरील विभागप्रमुखांना कळविण्यात यावे.

१६) ग्रामसेवक, प्रभारी अधिकारी व प्रविण प्रशिक्षक यांनी प्रक्रियेदरम्यान गावात मुक्काम करणे अपेक्षित आहे.

१७) गाव नियोजन प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशी ग्रामसभा व इतर सभा घ्यायच्या असलेने त्याबाबतच्या कायदेशीर नोटीसा मुदतीपूर्वी काढणे ही ग्रामसेवकाची वैधानिक जबाबदारी आहे.

१८) नियोजन प्रक्रियेदरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सन्मा.सदस्यांना नियमितपणे आमंत्रित करावे.

१९) झालेल्या कार्यक्रमाचे फोटो वेळोवेळी सादर करावेत.

२०) नियोजन प्रक्रियेचे आर्थिक व भौतिक अहवाल या कार्यालयाचे दि.९ जून २०१६ रोजीचे पत्रासोबतच्या नमुन्यात दर सोमवारी सादर करावेत.

२१) अहवाल संकलन करुन जिल्हास्तरावर नियमितपणे अग्रेषित करण्यासाठी पं.स.स्तरावर एका विस्तार अधिकारी व एक लिपिकवर्गीय कर्मचाऱ्याची नियुक्ती करुन त्यांचे नाव व संपर्क क्रमांक या कार्यालयास कळवावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,सातारा**